डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/पुणे/ IBPS/पोलीस व पॅरामिलीटरी /२५-२६/१७६० दिनांक:-१३/०३/२०२६

# महत्वाची सूचना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.३०/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र उमेदवारांसाठी आय.बी.पी.एस. व पोलीस तथा पॅरामिलीटरी भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (IBPS) तसेच पोलीस व पॅरामिलीटरी योजनेअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणवत्ता यादीतील पात्र उमेदवारांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. पात्र उमेदवारांना Confirmation Slip प्रदान करण्यात आले व विद्यार्थ्यांनी निवड केलेल्या संस्थांद्वारे दि.१३/०२/२०२६ पासून दि.१७/०२/२०२६ पर्यंत कागदपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

Confirmation Slip प्राप्त होऊन कागदपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे दि.१६/०३/२०२६ पासून पुढील सहामहिने कालावधी करीता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (IBPS) तसेच पोलीस व पॅरामिलीटरी प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात येत आहे.

## उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना:

- प्रशिक्षण कालावधी पूर्ण करणे सर्व उमेदवारांसाठी अनिवार्य आहे. प्रशिक्षण सुरू झाल्यानंतर कोणत्याही उमेदवारास प्रशिक्षण कालावधी दरम्यान मध्येच प्रशिक्षण सोडण्यास परवानगी दिली जाणार नाही.
- प्रशिक्षण कालावधीत कोणतीही शासकीय/निमशासकीय/खाजगी नोकरी करता येणार नाही.
- कागदपत्रे किंवा सादर केलेली माहिती खोटी आढळल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.
- किमान ७५% उपस्थिती अनिवार्य असून त्याआधारे विद्यावेतनाचा लाभ DBT द्वारे प्रदान केला जाईल.
- सर्व सराव चाचण्या (Test Series) देणे बंधनकारक आहे.
- प्रशिक्षण कालावधीत शिस्तभंग, गैरवर्तन, व्यसनाधीनता आढळल्यास प्रवेश रद्द केला जाईल.
- निवड झाल्यानंतर दिलेल्या तारखेपासून ०७ दिवसांच्या आत प्रशिक्षण संस्थेत रुजू होणे आवश्यक आहे, अन्यथा प्रतीक्षा यादीतील उमेदवारास संधी दिली जाईल.
- शासनाने ठरविलेल्या आरक्षणानुसार महिला, दिव्यांग, अनाथ व वंचित घटकांसाठी जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.
- सर्व अटी व शर्तीबाबत विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती http://barti.maharashtra.gov.in या संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच योजनेबाबत नविन माहिती जाणून घेण्यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी उपरोक्त नमूद संकेतस्थळावर भेट देऊन माहिती घ्यावी.

स्वाक्षरी.
(दिपा मुधोळ-मुंडे)
**महासंचालक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे.**